**MHST080008982018**

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | : | २३.०४.२०१८ |
| नोंदणी तारीख | : | २३.०४.२०१८ |
| निकाल तारीख | : | २०.०७.२०२४ |
| कालावधी | : | वर्ष महिने दिवस |
| | | ०६ ०२ २७ |

**(भाग 'अ')**

**खंडाळा येथील सह प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, खंडाळा यांचे न्यायालयात**
**( पिठासीन अधिकारी के. ए. पट्टेबहादुर )**

---

**नियमित फौजदारी खटला क्र. ४४/२०१८**
**निशाणी क्र. ४९**

**महाराष्ट्र शासन तर्फे,**
पोलीस निरीक्षक,
शिरवळ पोलीस स्टेशन,
तालुका – खंडाळा, जिल्हा – सातारा. ... अभियोगपक्ष

**विरुध्द**

१. **दत्तात्रय शंकर माने,**
वय – ३२ वर्षे धंदा – व्यापार,

२. **शंकर जानू माने,**
वय – ६७, धंदा – व्यापार,

३. **भिम शंकर माने,**
वय – ३४ धंदा – नोकरी,
अ.क्र. १ ते ३ रा. धनगरआळी, शिरवळ,
ता. खंडाळा, जि. सातारा.

४. **भरत लक्ष्मण वाघमारे,** .. आरोपी
वय – २६, धंदा – मजूरी,

५. **रवि प्रकाश वाघमारे,**
**(प्रकरण वेगळे केले)**
वय – १९, धंदा – मजूरी,
अ.क्र. ४ व ५ रा. खडकी,
ता. वाई, जि. सातारा.
हल्ली रा. धनगरआळी, शिरवळ,
ता. खंडाळा, जि. सातारा.

**दोषारोप** : भारतीय दंड विधान, १८६० चे कलम १४३, कलम १४७, कलम १४८, कलम १४९, कलम ३२३, कलम ३२४, कलम ३५४(ब), कलम ५०४, कलम ५०६ व महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३) अन्वये.

---

**प्रस्तुत खटल्यातील विधीज्ञ** : **सरकार तर्फे** : श्रीमती एस. डी. भोसले

: **आरोपी तर्फे** : श्री. ए.व्ही.गायकवाड

---

**(भाग 'ब')**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | २५.११.२०१७ |
| गुन्हा दाखल केल्याची तारीख | २५.११.२०१७ |
| प्रतिकथन नोंदविल्याची तारीख | २१.१२.२०१९ |
| पुरावा नोंदविण्यास सुरूवात झाल्याची तारीख | २०.०७.२०२४ |
| न्यायनिर्णयाच्या स्टेजवर लावल्याची तारीख | २०.०७.२०२४ |
| न्यायनिर्णय घोषित केल्याची तारीख | २०.०७.२०२४ |
| आदेशाची तारीख व काय आदेश ? | २०.०७.२०२४, निर्दोष मुक्तता करण्यात आली. |

**आरोपींची माहिती**

| अ.क्र | आरोपी चे नाव | अटक केल्याची | आरोपीला वैयक्तिक | गुन्हा दाखल झालेले कलम | आरोपी ची | आदेश |
|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | तारीख | जामिनावर सोडल्याची तारीख | | निर्दोष मुक्तता / आरोपीला शिक्षा | |
| १. | दत्तात्रय शंकर माने | ०८.१२. २०१७ | ०८.१२.२०१७ | भा.द.वि.कलम १४३, कलम १४७, कलम १४८, कलम १४९, कलम ३२३, कलम ३२४, कलम ३५४(ब), कलम ५०४, कलम ५०६, महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३) प्रमाणे | निर्दोष मुक्त करण्यात येते | निर्दोष मुक्त |
| २. | शंकर जानू माने | ०८.१२. २०१७ | ०८.१२.२०१७ | भा.द.वि.कलम १४३, कलम १४७, कलम १४८, कलम १४९, कलम ३२३, कलम ३२४, कलम ३५४(ब), कलम ५०४, कलम ५०६, | निर्दोष मुक्त करण्यात येते | निर्दोष मुक्त |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३) प्रमाणे | | |
| ३. | भिम शंकर माने | ०८.१२. २०१७ | ०८.१२.२ ०१७ | भा.द.वि.कलम १४३, कलम १४७, कलम १४८, कलम १४९, कलम ३२३, कलम ३२४, कलम ३५४(ब), कलम ५०४, कलम ५०६, महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३) प्रमाणे | निर्दोष मुक्त करण्या त येते | निर्दोष मुक्त |
| ४. | भरत लक्ष्मण वाघमारे | ०८.१२. २०१७ | ०८.१२.२ ०१७ | भा.द.वि.कलम १४३, कलम १४७, कलम १४८, कलम १४९, कलम ३२३, कलम ३२४, कलम ३५४(ब), कलम ५०४, कलम ५०६, महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३) प्रमाणे | निर्दोष मुक्त करण्या त येते | निर्दोष मुक्त |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५. | रवि प्रकाश वाघमारे | ०८.१२. २०१७ | ०८.१२.२ ०१७ | भा.द.वि.कलम १४३, कलम १४७, कलम १४८, कलम १४९, कलम ३२३, कलम ३२४, कलम ३५४(ब), कलम ५०४, कलम ५०६, महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३) प्रमाणे | सदर आरोपी विरुद्ध प्रकरण वेगळे चालविणेत आले. | सदर आरोपी विरुद्ध प्रकरण वेगळे चालविणेत आले. |

## (भाग 'क')

## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार

| अ.क्र | साक्षीदारांचे नाव | पुराव्याचे स्वरूप | साक्ष निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| १. | मंगेश महादेव देवरे | फिर्यादी | ४६ |
| २. | निलेश महादेव देवरे | साक्षीदार | ४७ |
| ३. | महादेव रामचंद्र देवरे | साक्षीदार | ४८ |

## अभियोग पक्षातर्फे/बचावातर्फे/

## न्यायालयाने दिलेल्या निशाणी क्रमांकाची यादी.

अ. अभियोग पक्षातर्फे

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| – | – | – |

## अभियोग पक्षातर्फे/बचावातर्फे/

## न्यायालयाने दिलेल्या आर्टीकलची यादी.

अ. अभियोग पक्षातर्फे

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| – | – | – |

## जप्त मुद्देमाल

| अ. क्र. | जप्त मुद्देमालाचा क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | १८/१८ | एक लोखंडी कोयता त्याची लोखंडी मुठीसह लांबी सुमारे १ फुट ४ इंच आरोपी दत्तात्रय शंकर माने याने गुन्हयात वापरला तो. |
| २. | १८/१८ | एक लोखंडी कोयता त्याची प्लास्टीक मुठीसह लांबी सुमारे १ फुट ६ इंच आरोपी शंकर जानू माने याने गुन्हयात वापरला तो. |
| ३. | १८/१८ | एक लोखंडी कोयता त्याची लोखंडी मुठीसह लांबी |

| | | |
|---|---|---|
| | | सुमारे १ फुट ७ इंच आरोपी भिम शंकर माने याने गुन्हयात वापरला तो. |
| ४. | १८/१८ | एक लोखंडी सळई तिची लांबी सुमारे १ फुट ६ इंच आरोपी भरत लक्ष्मण वाघमारे याने गुन्हयात वापरली ती. |
| ५. | १८/१८ | एक पांढरे रंगाचा फुल बाहयांचा शर्ट त्यावर ठिकठिकाणी रक्ताचे डाग असलेला निलेश महादेव देवडे याचे अंगावर गुन्हयाचे वेळी होता तो. |
| ६. | १८/१८ | एक पांढरे रंगाचे सॅन्डो बनियन त्यावर पुसट रक्ताचे डाग असलेले निलेश महादेव देवडे याचे अंगावर गुन्हयाचे वेळे होते ते. |
| ७. | १८/१८ | एक फिक्कट गुलाबी रंगाचा रुमाल पांढरे काळे चौकडयांचा त्यावर ठिकठिकाणी रक्ताचे डाग असलेला निलेश महादेव देवडे याचे जवळ गुन्हयाचे वेळी होता तो. |
| ८. | १८/१८ | एक निळेपांढरे रंगाचा फुल बाहयाचा शर्ट त्यावर पुसट रक्ताचे डाग असलेला मंगेश महादेव देवडे याचे अंगावर गुन्हयाचे वेळी होता तो. |

# न्यायनिर्णय

## (आदेश पारित दिनांक २० जुलै, २०२४)

आरोपी क्र. १ ते ४ हे त्यांचेवर भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १४३, कलम १४७, कलम १४८, कलम १४९, कलम ३२३, कलम ३२४, कलम ३५४(ब), कलम ५०४, कलम ५०६ व महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३) अन्वये दाखल असलेल्या गुन्ह्याचे खटल्यास सामोरे जात आहेत.

**अभियोग पक्षाचे कथन खालीलप्रमाणे** :-

०२. फिर्यादी मंगेश महादेव देवडे, वय – २९ वर्षे, धंदा –नोकरी, रा. शिरवळ, ता. खंडाळ, जि. सातारा यांनी खबर दिली की, वरील ठिकाणी त्यांची आई विजया, वडील महादेव, भाऊ निलेश, पत्नी नियोजिता असे एकत्रात राहणेस आहे. त्यांच्या घरासमोर दत्तात्रय शंकर माने हे राहणेस आहेत. दिनांक २५/११/२०१७ रोजी सकाळी १०.०० वा. चे सुमारास त्यांची आई विजया, वडील महादेव, भाऊ निलेश असे सर्वजन मिळून त्याच्या घरातील सामान हे त्यांच्या घरासमोर असलेले संदिप गुजर यांचे मालकी हक्काच्या जागेत सामान ठेवत होते. त्यावेळी दत्तात्रय शंकर माने, शंकर माने, भिम माने व दोन कातकरी तेथे आले व त्यांना म्हणाले की, तुम्ही

तुम्ही कोणाला विचारुन येथे सामान ठेवत आहात. तुम्ही तुमचे सामान येथे ठेवु नका, तेव्हा फिर्यादी त्यांना म्हणाले की, सदरचे सामान ठेवणेसाठी त्यांनी जागा मालक संदीप गुजर यांना विचारले आहे. त्यांनी सांगितल्यानंतरच ते त्यांचे सामान ठेवत आहेत. असे सांगितले तरी सुद्धा त्यांनी फिर्यादी व साक्षीदार यांना शिवीगाळ करु लागले. त्यावेळी त्यांची आई त्यांना म्हणाली की, तुम्ही आम्हाला शिव्या देवु नका. असे म्हणाले असता शंकर माने व दत्तात्रय माने हे त्यांच्या आईच्या अंगावरती धाऊन गेले व त्यांनी त्यांच्या आईला हाताने मारहाण करुन तिच्या छातीवरती हात टाकून तिचा ब्लाऊज फाडला.

०३. फिर्यादीने पुढे त्यांचे फिर्यादीत कथन केले आहे की, त्यामुळे फिर्यादी व त्यांचा भाऊ निलेश वडील महादेव असे त्यांच्या आईला सोडविणेसाठी गेले असता भिम माने हा त्याच्या घरात पळत जाऊन त्याने घरातून ३ कोयते आणले व एक कायेता स्वतःच्या हातात ठेवून उरलेले दोन कोयते दत्तात्रय माने शंकर माने यांच्या हातात दिले व म्हणाले की, तुम्हाला आता जिवंत ठेवणार नाही. असे म्हणून दत्तात्रय माने याने त्याच्या हातातील कोयत्याने त्यांचा भाऊ निलेश याचे डोक्यात मारले. त्यामुळे फिर्यादीच्या भावाच्या डोक्यातुन रक्त आले व तो खाली पडला त्यानंतर दत्तात्रय माने याने त्याच्या हातातील कायत्याने त्यांच्या वडीलांच्या डोक्यात, डोक्याच्या खाली मारहाण केली. तसेच शंकर माने याने त्यांच्या आईला

हाताने व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच त्यांना दोन कातकरी यांनी त्यांच्या हातातील लोखंडी सळईने त्यांच्या नाकावर व अंगावरती मारहाण केली. झाले मारहाणीत ते खाली पडले असता त्यांना वरील सर्व लोकांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. झाले मारहाणीत त्यांचा भाऊ निलेश याला जबर दुखापत झाली असुन फिर्यादीला तसेच आईवडीलांना सदर मारहाणीत मुका मार लागलेला आहे. सदरची भांडणे सोडविणेसाठी त्यांच्या गावातील १. विजय देवडे, २. विकास सणस, ३. संदिप आसलेकर, ४. संजय देवडे हे आले व त्यांनी भांडणे सोडविली. त्यानंतर ते तक्रार देणेस शिरवळ पोलीस स्टेशनला आले असता त्यांना सर्वांना झाले मारहाणीबाबत मेडीकल यादी देवून प्राथमिक आरोग्य केंद्र, शिरवळ येथे औषधोपचाराकरीता पाठविले आहे. तेथे त्यांचेवर उपचार झालेनंतर ते शिरवळ पोलीस स्टेशनला आले व त्यांनी तक्रार दाखल केली.

०४. सदर फिर्यादीच्या आधारे शिरवळ पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिष्टर क्रमांक २८०/२०१७ हा भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १४३, कलम १४७, कलम १४८, कलम १४९, कलम ३२३, कलम ३२४, कलम ३५४(ब), कलम ५०४, कलम ५०६ व महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३) अन्वये दाखल करणेत आला. त्यानंतर तपासी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक, पी.एन.खरात, यांनी तपास पूर्ण झाल्यानंतर त्यांनी आरोपींविरुध्द न्यायालयामध्ये

दोषारोपपत्र दाखल केले.

०५. आरोपींविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल झाल्यानंतर आरोपीविरुध्द निशाणी २५ वर दोषारोपपत्र नोंदवण्यात आला. पूर्वपिठासीन अधिकारी यांनी भारतीय दंड विधान कलम १४३, कलम १४७, कलम १४८, कलम ३२४ कलम १४९, कलम ३२३ सह कलम १४९, कलम ३५४(ब) सह कलम १४९, कलम ५०४ सह कलम १४९, कलम ५०६ सह कलम १४९ व महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७/१/३ अन्वये दोषारोप ठेवणेत आला. आरोपींना सदरचा दोषारोप त्यांच्या मातृभाषेतून वाचून दाखविणेत आला व समजावून सांगण्यात आला असता त्यांनी तो नाकारुन संपरिक्षेची मागणी केली.

०६. आरोपी क्र. १ ते ४ च्या विधीज्ञांनी निशाणी क्र. ४२ वर आरोपी क्र. १ ते ४ यांची आरोपी क्र. ५ यांचे पासुन वेगळी केस चालविणेचा आदेश व्हावा अशी विनंती करणारा अर्ज दिला. सदर अर्जाचे अवलोकन केले असता असे लक्षात आले की, आरोपी क्र. ५ हा कोर्टात हजर राहत नाही. आरोपी क्र. ५ विरुद्ध आदेश पारीत केल्याचे आढळून आले परंतु तरीही सदर आरोपी क्र. ५ हा न्यायालयात हजर न झालेने सदरचे प्रकरण हे आरोपी क्र. १ ते ४ यांचेपासून आरोपी क्र. ५ यांचे पासून वेगळी चालविणेचा आदेश दिनांक २०.०७.२०२४ रोजी निशाणी क्र. १ वर पारीत

करण्यात आला.

०७. आरोपींविरुध्द ठेवण्यात आलेले तोहमत, तसेच अभियोग पक्षाने सादर केलेला पुरावा व त्यास आरोपींनी घेतलेला बचाव व दोन्ही पक्षाच्या विधीज्ञांनी केलेला युक्तिवाद इत्यादी वरुन खालील मुद्दे विचाराधीन होतात. त्यावरील निष्कर्ष कारणमीमांसेसहीत खालीलप्रमाणे नोंदविलेला आहे.

| अ.नं | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, दिनांक २५/११/२०१७ रोजी सकाळी १०.०० वा. चे सुमारास मौजे शिरवळ, तालुका – खंडाळा गावच्या हद्दीत धनगर गल्ली येथे संदिप गुजर यांचे सिटी सर्वे नंबर ९८४ मधील मोकळया जागेत आरोपी महादेव देवडे, विजया देवडे, मंगेश देवडे, निलेश देवडे हे त्यांचे नवीन बांधलेल्या घरांचे विटांचे तुकडे, सिमेंट वाळू असे टाकाऊ सामान संदपि गुजर यांचे मालकी हक्काचे जागेत ठेवत असताना आपसात संगणमत करुन फिर्यादी व साक्षीदारास तुम्ही कोणाला विचारुन सामान येथे ठेवता असे म्हणाला व त्यांना मारहाण केली | **नाही.** |

| | | |
|---|---|---|
| | तसेच आरोपी हे गैरकायद्याच्या मंडळातील आसामी होते, म्हणून आरोपीविरुद्ध **भारतीय दंड विधान कलम १८६० चे कलम १४३** अन्वये गुन्हा केला काय ? | |
| २. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी आणि ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करुन समान उद्दीष्ट साध्य करण्यासाठी बेकायदेशीर जमाव केला म्हणून आरोपींनी **भारतीय दंड विधान १८६० चे कलम १४७** अन्वये गुन्हा केला काय ? | **नाही.** |
| ३. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी आणि ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करुन समान उद्दीष्ट साध्य करण्यासाठी बेकायदेशीर जमाव जमवून हत्यारानिशी सज्ज होवून दंगा केला म्हणून आरोपींनी **भारतीय दंड विधान १८६० चे कलम १४८** अन्वये गुन्हा केला काय ? | **नाही.** |
| ४. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी आणि ठिकाणी आरोपींनी आपसात संगणमत करुन फिर्यादी व साक्षीदारास हातातील कोयता, सळई याने मारहाण करुन इच्छापूर्वक गंभीर दुखापत केली म्हणून | |

| | | |
|---|---|---|
| | आरोपींनी **भारतीय दंड विधान संहिता १८६० चे कलम ३२४ सह कलम १४९** अन्वये गुन्हा केला काय ? | **नाही.** |
| ५. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी आणि ठिकाणी आरोपींनी आपसात संगणमत करुन फिर्यादी व साक्षीदारास हाताने व लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन इच्छापूर्वक जखमी केले म्हणून आरोपींविरुद्ध **भारतीय दंड विधान १८६० चे कलम ३२३ सह कलम १४९** अन्वये गुन्हा केला काय? | **नाही.** |
| ६. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी आणि ठिकाणी आरोपी शंकर माने व दत्तात्रय माने यांनी फिर्यादीच्या आईच्या छातीवर हात घालून त्यांचा ब्लाऊज फाडला व त्यांचे मनास लज्ज्ञा उत्पन्न होईल असे कृत्य केले म्हणून आरोपींनी **भारतीय दंड विधान १८६० चे कलम ३५४(ब) सह कलम १४९** अन्वये गुन्हा केला काय? | **नाही.** |
| ७. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी आणि ठिकाणी आरोपींनी संगनमताने फिर्यादी व साक्षीदार यांना इच्छापूर्वक जखमी करुन शिवीगाळ केली व असे करुन सार्वजनिक शांततेचा भंग होईल असे कृत्य | **नाही.** |

| | | |
|---|---|---|
| | केले म्हणून आरोपींनी **भारतीय दंड विधान १८६० चे कलम ५०४ सह कलम १४९** अन्वये अन्वये गुन्हा केला काय? | |
| ८. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी आणि ठिकाणी आरोपींनी संगनमताने फिर्यादी व साक्षीदार यांना इच्छापूर्वक जखमी करुन दमदाटी केली म्हणून आरोपींनी **भारतीय दंड विधान १८६० चे कलम ५०६ सह कलम १४९** अन्वये अन्वये गुन्हा केला काय? | **नाही.** |
| ९. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी आणि ठिकाणी आरोपींली संगनमताने जिल्हयात कायदा सुव्यवस्था राखणेकामी मा. जिल्हादंडाधिकारी, सातारा यांचेकडील आदेशान्वये वर नमूद कालावधीत जमावबंदी व शस्त्रबंदी आदेश जारी केला असताना देखील आरोपींनी बेकायदेशीर जमाव जमवून सदर आदेशाचे उल्लंघन केले म्हणून आरोपींनी **महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७/१/३** अन्वये गुन्हा केला काय ? | **नाही.** |
| १०. | आदेश काय ? | **आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते.** |

## कारणमीमांसा

०८. अभियोग पक्षाने आरोपींविरुध्द ठेवण्यात आलेली तोहमत सिध्द करण्याकरिता फिर्यादी मंगेश महादेव देवरे यास साक्षीदार क्र. १ म्हणून निशाणी क्र. ४६ वर, साक्षीदार निलेश महादेव देवरे यांस साक्षीदार क्र. २ म्हणून निशाणी क्र. ४७ वर व साक्षीदार महादेव रामचंद्र देवरे यांस साक्षीदार क्र. ३ म्हणून निशाणी क्र. ४८ वर तपासणेत आले. आरोपींविरुध्द पुरावा आढळून न आलेने आरोपीविरुद्ध भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ३५१ अन्वयेचे निवेदन नोंदविण्यात आलेले नाही, तसा आदेश दिनांक २०.०७.२०२४ रोजी पारीत करणेत आला.

**मुद्दे क्रमांक १ ते ९ करिता –**

०९. मुद्दे क्रमांक १ ते ९ हे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे कथनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी मी त्यांचा एकत्रीतपणे विवेचन करीत आहे.

१०. अभियोग पक्षाने आरोपीवरील तोहमत सिध्द करण्याकरिता तीन साक्षीदार तपासणेत आलेले आहेत. साक्षीदार क्र. १ यांनी त्याच्या सरतपासात कथन केले आहे की, घटना काय, कधी व कशी घडली त्यांना माहित नाही. त्यांनी शिरवळ पोलीस स्टेशनला तक्रार दिली होती, त्यातील मजकूर त्यांना माहित नाही, त्यावर त्यांची सही आहे. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षास सहाय्य केलेले नाही.

अभियोग पक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात सदर साक्षीदाराने नाकारले आहे की, दिनांक २५.११.२०१७ रोजी सकाळी १०.०० वाजता ते त्यांचे सामान संदिप गुजर यांचे मोकळया जागेत ठेवत होते त्यावेळी आरोपी त्या ठिकाणी आले व त्यांनी त्यांना मारहाण व शिवीगाळ केली, त्यांचे आईला मारहाण केली, आईचा ब्लाऊज फाडून विनयभंग केला, भिम माने यांनी घरात जाऊन तीन कोयते आणले त्यांनी कायेत्यांनी मारहाण केली. त्यांना त्यांच्या फिर्यादीतील अधोरेखांकित भांग अ वाचून दाखविला. तो त्यांच्या जबाबात का नमूद आहे याचे कारण त्यांना माहित नाही. सदर साक्षीदाराचा उलटतपास आरोपीच्या विधीज्ञांनी नाकारला.

११. साक्षीदार क्र. २ व साक्षीदार क्र. ३ यांनी त्यांच्या सरतपासात कथन केले आहे की, घटना काय, कधी व कशी घडली हे त्यांना माहित नाही. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षास सहाय्य केलेले नाही. अभियोग पक्षातर्फे घेण्यात आलेलया उलटतपासात सदर साक्षीदाराने नाकारले आहे की, दिनांक २५.११.२०१७ रोजी सकाळी १०.०० वाजता ते त्यांचे सामान संदिप गुजर यांच्या मोकळया जागेत ठेवत होते, त्यावेळी आरोपींनी त्यांना शिवीगाळ केली, आईला हाताने मारहाण केली, आईचा ब्लाऊज फाडला विनयभंग केला. दोन्ही साक्षीदारांना त्यांचे जबाबातील मजकूर वाचून दाखविण्यात आला. तो त्यांनी पोलीसांना सांगितला असल्याचे त्यांनी नाकारले. आरोपी व त्यांचेमध्ये तडजोड

झाल्याचे त्यांनी कथन केले.

१२. उपरोक्त नमूद साक्षीदार क्र. १, क्र. २ व क्र. ३ यांची साक्ष पाहता, त्यांनी घटना काय, कधी व कशी घडली हे माहित नसल्याचे कथन केलेले आहे. त्यांनी त्यांचे जबाबातील मजकूर त्यांना माहित नसल्याचेही कथन केलेले आहे.

१३. प्रस्तूत खटल्यामध्ये फिर्यादी यांनी निशाणी क्र. ४४ वर तडजोड अर्ज दाखल केली असून त्यात त्यांनी कथन केले आहे की, सदरचे मुळ फिर्यादी व आरोपी यांचेमध्ये आपआपसात तडजोड झालेली आहे. त्यांचेतील वाद मिटावा तसेच भविष्यात एकमेकांना कोणत्याही प्रकारे त्रास न देणे तसेच एकमेकांना शिवीगाळ न करणे, मारहाण न करणे, एकमेकांकडे खुणशिने न बघणे वगैरे मूळ फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये ठरलेले आहे. भविष्यात ते भांडणतंटा करणार नाहीत व गावामध्ये शांततामय ठवणेचे असलेने त्यांना सदरचा खटला चालविणेचा नाही, त्यांना साक्षी पुरावा देणेचा नाही तसेच साक्षीदार ही तपासणेचे नाहीत.

१४. उपरोक्त नमूद साक्षीदार क्र. १, क्र. २ व क्र. ३ यांची साक्ष व निशाणी क्र. २१ वरील तडजोड पुरसीस चे अवलोकन केले असता असे लक्षात येते की, सदर आरोपी व फिर्यादी यांचेमध्ये तडजोड झालेली आहे. त्यांना सदर प्रकरण पुढे चालविणेचे नाही. तसेच साक्षीवरुन त्यांचेविरुद्ध पुरावा आढळून आलेला नाही.

१५. अभियोग पक्षामार्फत तपासणेत आलेल्या फिर्यादीच्या साक्षीवरुन दिनांक २५/११/२०१७ रोजी सकाळी १०.०० वा. चे सुमारास मौजे शिरवळ, तालुका – खंडाळा गावच्या हद्दीत धनगर गल्ली येथे संदिप गुजर यांचे सिटी सर्वे नंबर ९८४ मधील मोकळया जागेत आरोपी महादेव देवडे, विजया देवडे, मंगेश देवडे, निलेश देवडे हे त्यांचे नवीन बांधलेल्या घरांचे विटांचे तुकडे, सिमेंट वाळू असे टाकाऊ सामान संदपि गुजर यांचे मालकी हक्काचे जागेत ठेवत असताना आपसात संगणमत करुन फिर्यादी व साक्षीदारास तुम्ही कोणाला विचारुन सामान येथे ठेवता असे म्हणाला व त्यांना मारहाण केली तसेच आरोपी हे गैरकायद्याच्या मंडळातील आसामी होते, म्हणून आरोपीविरुद्ध **भारतीय दंड विधान कलम १८६० चे कलम १४३** अन्वये गुन्हा केला, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी आणि ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करुन समान उद्दीष्ट साध्य करण्यासाठी बेकायदेशीर जमाव केला म्हणून आरोपींनी **भारतीय दंड विधान १८६० चे कलम १४७** अन्वये गुन्हा केला, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी आणि ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करुन समान उद्दीष्ट साध्य करण्यासाठी बेकायदेशीर जमाव जमवून हत्यारानिशी सज्ज होवून दंगा केला म्हणून आरोपींनी **भारतीय दंड विधान १८६० चे कलम १४८** अन्वये गुन्हा केला, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी आणि ठिकाणी आरोपींनी आपसात संगणमत करुन फिर्यादी व साक्षीदारास हातातील कोयता, सळई याने मारहाण करुन इच्छापूर्वक गंभीर दुखापत केली म्हणून आरोपींनी **भारतीय दंड विधान संहिता**

**१८६० चे कलम ३२४ सह कलम १४९** अन्वये गुन्हा केला, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी आणि ठिकाणी आरोपींनी आपसात संगणमत करुन फिर्यादी व साक्षीदारास हाताने व लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन इच्छापूर्वक जखमी केले म्हणून आरोपींविरुद्ध **भारतीय दंड विधान १८६० चे कलम ३२३ सह कलम १४९** अन्वये गुन्हा केला, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी आणि ठिकाणी आरोपी शंकर माने व दत्तात्रय माने यांनी फिर्यादीच्या आईच्या छातीवर हात घालून त्यांचा ब्लाऊज फाडला व त्यांचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले म्हणून आरोपींनी **भारतीय दंड विधान १८६० चे कलम ३५४(ब) सह कलम १४९** अन्वये गुन्हा केला काय, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी आणि ठिकाणी आरोपींनी संगनमताने फिर्यादी व साक्षीदार यांना इच्छापूर्वक जखमी करुन शिवीगाळ केली व असे करुन सार्वजनिक शांततेचा भंग होईल असे कृत्य केले म्हणून आरोपींनी **भारतीय दंड विधान १८६० चे कलम ५०४ सह कलम १४९** अन्वये अन्वये गुन्हा केला, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी आणि ठिकाणी आरोपींनी संगनमताने फिर्यादी व साक्षीदार यांना इच्छापूर्वक जखमी करुन दमदाटी केली म्हणून आरोपींनी **भारतीय दंड विधान १८६० चे कलम ५०६ सह कलम १४९** अन्वये अन्वये गुन्हा केला, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी आणि ठिकाणी आरोपींली संगनमताने जिल्हयात कायदा सुव्यवस्था राखणेकामी मा. जिल्हादंडाधिकारी, सातारा यांचेकडील आदेशान्वये वर नमूद कालावधीत जमावबंदी व शस्त्रबंदी आदेश जारी केला असताना देखील आरोपींनी

बेकायदेशीर जमाव जमवून सदर आदेशाचे उल्लंघन केले म्हणून आरोपींनी **महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७/१/३** अन्वये गुन्हा केला या बाबी संशयापलिकडे सिध्द करणेस अभियोग पक्षास अपयश आलेले आहे. त्यामुळे आरोपींना निर्दोष मुक्त करणे न्यायोचित होईल.

१६. वरील सर्व कारणांचा विचार करुन मी मुद्दा क्रमांक १ ते ९ चे उत्तर **नकारार्थी** नोंदवतो व मुद्दा क्रमांक १० साठी खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | आरोपी क्र. **१. दत्तात्रय शंकर माने, वय – ३२ वर्षे, व्यवसाय – व्यापार, आरोपी क्र. २. शंकर जगू माने, वय – ६७ वर्षे, व्यवसाय – व्यापार, आरोपी क्र. ३ भिम शंकर माने, वय – ३४ वर्षे, धंदा – नोकरी, रा. आरोपी क्र. १ ते आरोपी क्र. ३ धनगरआळी, शिरवळ, ता. खंडाळा, जि. सातारा व आरोपी क्र. ४ भरत लक्ष्मण वाघमारे, वय – २६ वर्षे, धंदा – मजूरी, , रा. खडकी, ता. वाई, जि. सातारा हल्ली रा. धनगरआळी, शिरवळ, ता. खंडाळा, जि. सातारा** यांना भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७१(१) नुसार त्यांचेवर भारतीय दंड विधान कलम १४३, कलम १४७, कलम १४८, कलम ३२४ कलम १४९, कलम ३२३ सह कलम १४९, कलम ३५४(ब) सह कलम १४९, कलम ५०४ सह कलम १४९, कलम ५०६ सह कलम १४९ |

| | |
|---|---|
| | व महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७/१/३ अन्वयेच्या दोषारोपातून निर्दोष मुक्त करण्यात येते. |
| २. | आरोपींचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येते. |
| ३. | आरोपींनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम ४८१ प्रमाणे प्रमाणे र.रु. १५,०००/– चा प्रत्येकी वैयक्तिक बंधपत्र द्यावा. |
| ४. | सदर प्रकरणातील उपरोक्त न्यायनिर्णयात भाग क मध्ये नमूद मुद्देमाल हा मुल्यहीन असल्याने अपील कालावधीनंतर नष्ट करण्यात यावी. |
| (न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आले.) | |

PATTEBAHADUR KARUNA

Digitally signed by PATTEBAHADUR KARUNA
Date: 2024.07.22 11:34:16 +0530

(के. ए. पट्टेबहादुर)

दिनांक – २०.०७.२०२४ सह. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, खंडाळा.

**प्रमाणपत्र**

मी असे कथन करते की, सदर पी.डी.एफ. मधील प्रत्येक शब्द हा मुळ न्यायानिर्णयातील मजकूराप्रमाणे खरा व बरोबर आहे.

| | |
|---|---|
| न्यायालयाचे नाव | श्रीमती के. ए. पट्टेबहादुर,<br>सह प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, खंडाळा. |

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | सौ. सुवर्णा संकेत शिंदे. |
| आदेश पारीत दिनांक | २०.०७.२०२४ |
| आदेशावर पिठासीन अधिकारी यांची स्वाक्षरी दिनांक | २०.०७.२०२४ |
| आदेशाची पी.डी.एफ.अपलोड दिनांक | २२.०७.२०२४ |

Sd/-
(एस. एस. शिंदे)
लघुलेखिका